रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली



शुक्रवार, दि. ०६ मे, २०२२

## मराठी विभाग व इतिहास विभाग

### राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी निमित्त व्याख्यान

### 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : जीवन व कार्य'

### अहवाल

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २२ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्र क्र. ५२ नुसार राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दीचे औचित्य साधून मराठी विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'राजर्षी शाहू : जीवन व कार्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्याआधी राजश्री छ. शाहूंच्या प्रतिमेचे पूजन करून सकाळी ठीक १०.०० वाजता १०० सेकंद स्तब्धता पाळून आदरांजली वाहण्यात आली.

प्रमुख वक्ते म्हणून डॉ. व्ही. आर. माने (क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल) निमंत्रित होते. डॉ. माने आपल्या मनोगतात म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराज हे राज्यकारभारात प्रयोग करणारे राजे होते त्यामुळे त्यांनी धोरणात्मक व कार्यात्मक निर्णय आपल्या संस्थानामध्ये घेतले. दीनदलितांना सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी शाळांची उभारणी केली. त्याचबरोबर बहुजन समाजातील तरुणांना शिकता यावे, यासाठी व वसतिगृहांची निर्मिती देखील करण्यास राजश्री शाहूंनी प्रेरणा दिली.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे. के. (बापू) जाधव (सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्थेचे) होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, ''राजर्षी शाहू महाराजांनी दूरदृष्टीतून राधानगरीचे मोठे धरण बांधले. या धरणाचा फायदा सर्वसामान्य जनतेला व शेतकऱ्यांना झाला.'' यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय इतिहास विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनावले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. तेजस चव्हाण; तर आभार प्रा. स्वाती मगदूम यांनी मानले. प्रस्तुत कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापकांसह विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या जीवन व कार्याची ओळख पटली.

**लाभार्थी :** ७३





प्रमुख
मराठी विभाग

प्रमुख
इतिहास विभाग

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)

Scanned by CamScanner